Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# १९६० नंतरची दलित कविता आणि विद्रोहाचे स्वरूप

**प्रा.डॉ. व्यंकट दि. कोरेबोईनवाड**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलितांना आत्मभान लाभले. याच आत्मभानातून दलितांनी आत्मशोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मशोधाच्या प्रक्रियेतून दलितांनी हजारो वर्षापासून वाट्यास आलेल्या यातनामय दुःखी जीवनाला नकार दिला. त्यातून विद्रोहाचा आविष्कार झाला. विद्रोहाची संकल्पना स्पष्ट करताना प्रा. योगेंद्र मेश्राम म्हणतात, " व्यक्ती आणि समाजजीवनात निर्माण झालेली हरतऱ्हेची विषमता, अमानुष अस्पृश्यता, अन्याय, विटंबना याविरुद्ध अंतःकरणातून विद्रोही आवाज उठवून न्यायाची, प्रेमकरुणेची, समतेची, सुरक्षिततेची व माणसाच्या आस्मिता व सन्मान प्रतिष्ठेची एकूण आमुलाग्र परिवर्तनाची मागणी करणारे बंडखोर तेजस्वी तत्त्व म्हणजे विद्रोह." दलित साहित्याच्या केंद्रस्थानी विद्रोह हेच मूल्य असल्याचे दिसून येते. येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित समाजात चळवळ निर्माण झाली. शिक्षणाच्या माध्यमातून आस्मिता जागृत झालेल्या सुशिक्षित पिढीने आपल्या साहित्याच्या माध्यमातून गुलामगिरी दास्यत्व नाकारले. दलितांवरील अन्याय-अत्याचाराविरोधात प्रस्थापित, व्यवस्थेविरुद्ध आक्रमकपणे संघर्ष केला. प्रस्थापितांनी अत्यंत क्रूरतेने पिढ्यान् पिढ्यांपासून गुलामी लाचारीची बंधने दलितीवर लादली. म्हणून इथला दलित साहित्यिक धर्मव्यवस्थेची ही सर्व बंधने फोडून - तोडून टाकून ती उद्ध्वस्त करण्याची भाषा करतो. हा संघर्ष म्हणजेच 'विद्रोह' होय.

दलित हा सुध्दा एक माणूस आहे. त्यालाही माणुसकीने जगण्याचा अधिकार आहे. तरीसुद्धा पशूपातळीवर वागणूक देऊन त्यांची विटंबना केली जाते. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी दलितांना अस्पृश्यतेच्या कलंकातून मुक्त करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रस्थापितांसमोर आर्जव, विनंत्या केल्या. परंतु प्रस्थापितांच्या व्यवस्थेने त्यांची ही मागणी धुडकावून लावली. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी क्रांतीचा, विद्रोहाचा मार्ग स्वीकारला. विद्रोहाच्या माध्यमातून विकृत व्यवस्थेला

संपवून नवसमाज निर्मितीसाठी प्रयत्न केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा दलितांना अशाच व्यवस्थेविरोधात युगानुयुगांचे अराजकत्व संपविण्यासाठी विद्रोह करावा लागला.

परंतु दलितांचा हा विद्रोह उच्चवर्णीय व्यक्तिविरुद्धचा नसून प्रस्थापित मूल्ये - संस्कृती-आर्थिक विषमतेविरुद्धचा आहे. अन्याय - अत्याचार- शोषण - अस्पृश्यता याविरुध्द दलित साहित्याचा विद्रोह आहे. या विद्रोहातून सामाजिक न्याय, माणुसकीची मूल्ये दलित साहित्याला अपेक्षित आहेत आणि त्याद्वारे तो नवसमाजनिर्मिती करू पाहतो आहे. अशाप्रकारे केवळ विरोधासाठी विरोध म्हणून विद्रोहाचा जन्म झाला नसून मानवतावादासाठी त्याचा जन्म झाला आहे. म्हणूनच बाबुराव बागूल म्हणतात, "दलित साहित्य-म्हणजे सूडवाद्यांचे साहित्य नाही. दलित साहित्य विद्वेष पसरविणारे साहित्य नाही. दलित साहित्य माणसाच्या महतीचा आणि मुक्तीचा प्रथम पुरस्कार करते आणि तसेच ती एक ऐतिहासिक गरजही आहे." अशाच विद्रोहाचा आविष्कार दलित साहित्याचे प्राणतत्त्व आहे. प्रस्तुत शोधनिबंधात विषयविस्तार भयास्व काही निवडक कवींच्या कवितांचा प्रातिधिनिक अभ्यास करण्यात आला आहे ह्या कवितेतून येणाऱ्या विद्रोहाचा शोध आपणांस पुढीलप्रमाणे घेता येईल.

" रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी ?
मरेपर्यंत राहायचे का असेच युद्धकैदी ?
ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता आभाळभर झालीय माझ्याही आत्म्याने झिंदाबादची गर्जना
केलीय रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो आता या शहरा शहराला आग लावीत चला! "

(गोलपीठा, पृष्ठ ३१)

" शेवटी तुम्ही हे असं वाल्मिकीचं वारूळ करून टाकलंत कारट्यांनो ! तुमच्या पुराणकथांच्या बाजिंद्या
कोकशास्त्रांची आम्हाला कीळस यायला लागलीय पुन्हा पुन्हा." (तुही इयत्ता कंची ?' पृष्ठ ५२)

नामदेव ढसाळांची ही भाषा परिवर्तनाच्या क्रांतिविचारांची आहे. यातून दलितांची अनंत वर्षापासून होत असलेली घुसमट, प्रक्षुब्ध स्वर, वेदना, विद्रोह प्रकट होत असल्याचे दिसून येते. आपले हीन जगणे जगत असताना त्यांचे शब्द बंडखोरी धारण करतात. त्यांची भाषा अश्लील, अशिष्ट, ओंगळ आहे, असा आक्षेप केला जातो, परंतु ही एका दलितांच्या अनुभवाची, जगण्याची भाषा आहे. म्हणूनच हा समाजसन्मुख कवी पांढरपेशाविरुध्द विद्रोहाची भाषा करत असल्याचे दिसून येते.

दया पवारांनी आपल्या 'कोंडवायात' दलितांच्या छळाची कहाणी मांडली आहे. त्यांची ही कविता शुद्रांचे गावकुसाबाहेरचे गळफासाचे जीणे, आर्थिक दुरवस्था, पदोपदी होणारी सामाजिक अवहेलना याचे जहाल अनुभूतिविश्व निर्माण करते. इथल्या अन्यायी व्यवस्थेविरुद्ध दया पवारांच्या भाषेने संघर्षाभिमूख पवित्रा घेतला आहे. प्रस्थापितांनी रचलेले काव्य हे ढोंगी असून जाणीवपूर्वक रचलेले होते. त्यातून दलितांच्या व्यथा, वेदनेला कधीही न्याय दिला गेला नाही. म्हणूनच क्रौंच पक्ष्याच्या दुःखाने हळहळणाऱ्या वाल्मिकीला दलितांचे हीन जगणे का दिसले नाही? महर्षी वाल्मिकी गावकुसाबाहेरच्या अन्यायी-अत्याचारीत जगण्याने व्यथित का झाले नाहीत असा प्रश्न ते करतात, "

रामराज्याची स्तुती गाणाऱ्या
हे महाकवी
तिथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला
हे महाकवी...
तुला महाकवी तरी कसे म्हणावे !
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास...
... तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते." ('कोंडवाडा', पृष्ठ १५)

मानवी संस्कृतीच्या व्यथा-वेदनांनी व्यापलेली त्यांची कविता विद्रोहाने अभिव्यक्त झालेली आहे. शतकानुशतके कैद्यांसारखे कोंडवाड्यात जगणाऱ्या शोषितांची तगमग त्यांच्या भाषेतून प्रकट होत असलेली दिसून येते.

केशव मेश्राम यांच्या 'उत्खनन' या काव्यसंग्रहातून दलितांच्या वेदना, उपेक्षित जीवन, दारिद्र्य, अपेक्षाभंग चित्रित झाले आहे. दलितांच्या दारिद्र्याचे, रोगराईचे जग साकार-करताना बदलत्या काळाचा वेधही त्यांनी घेतलेला दिसून येतो. आंबेडकरी प्रेरणेने आणि चळवळीने भारावलेले दलित विद्रोहीमन या कवितेतून प्रकट होताना दिसून येते.

" साल्या तुकडाभर भाकरीसाठी, गाडीभर लाकडं फोडशील काय ? चिंधूक नेसले आईच्या पटकुराने, घामेजले हाडके शरीर पुसशील काय?
बापाच्या बिडीकाडीसाठी, भावाबहिणीची हाडके झिजवशील? त्याच्या दारुच्या घोटासाठी भडवेगिरी करशील ?"('उत्खनन'- पृष्ठ ७४)

केशव मेश्रामांच्या भाषेने समग्र दलितांच्या दुःखाला वाचा फोडली आहे. समाजव्यवस्थेने नाकारलेल्या गुलामांचे दैन्य आणि दारिद्र्य या भाषेतून आलेले आहे. त्यांच्या भाषेतला दलितांचा विद्रोह संयत्तेला धरून आलेला दिसून येतो.

"नागडा आलो

आणि इथेही नागवला गेलो

समाज पुरुषाच्या अहंकाराने

हे संस्कृती प्रिय देशा!

माझा नागडेपणा

तुला कधी झाकताच आला नाही...('सुरुंग' पृष्ठ ०१)

त्र्यंबक सपकाळेंच्या 'सुरंग' या कवितासंगऱ्हातून अशा-विद्रोहाच्या ठिणग्या बाहेर पडते आहेत. प्रस्थापितांच्या अन्यायी न्यवस्थेला सुरुंग लावणारी त्यांची कविता आहे. आतापर्यंतची जी व्यथा-वेदना सहन केलेली आहे, ती बाबासाहेबांच्या तत्त्वविचारामुळे असहय्य झाली आहे. दलितांमध्ये आत्मभाव-निर्माण झाले आहे. अशी अस्वस्थ, अशांत मनाचा स्फोट होऊन प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देत आहे. सपकाळेंच्या 'सुरूंग' मध्ये दलितांच्या व्यथा, वेदना, आत्मभान मनःवृत्तीचा असा स्फोटकपणा पदोपदी जाणवतो. म्हणून त्यांची भाषा विद्रोहाची दिसून येते.

यशवंत मनोहर यांच्या 'उत्थानगुंफा' मधील कविता आंबेडकरी बाण्याच्या असल्यामुळे मुळातच त्यांच्यातून टोकाचा विद्रोह अभिव्यक्त झाला आहे. त्यांनी आपल्या काव्यसंग्रहाची अर्पणपत्रिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदिविद्रोही कवी केशवसुतांना अर्पण केली आहे. " येथील ईश्वरशाही, अध्यात्म व कर्मविपाकशाही, यांच्या नावाखाली शतकानुशतके चाललेल्या, अमानुष शोषणाचा, जळजळीत आयुष्याने मृत्युलेख लिहिणाऱ्या, बाबासाहेब आंबेडकर, नावाच्या सर्व दलितांच्या युगप्रवर्तक विद्रोहाला, आणि, माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदि विद्रोही कवी केशवसुतांना "(उत्थानगुंफा, अर्पणपत्रिका)

डॉ. यशवंत मनोहर दलितांच्या आत्मनिष्ठ जाणिवा, वेदना, आशा-आकांक्षा विद्रोही भाषेतून प्रकट करतात. ईश्वराचे अस्तित्व निर्माण करून, जीव-जगताची पायमल्ली करून दलितांच्या हक्काची, अभ्युदयाची तमा न बाळगणाऱ्या प्रस्थापित भूतकाळाला ते नकार देतात. म्हणून भूतकाळातील परंपरा आणि वर्तमानकाळातील हीन जगण्याला आपल्या तीव्र संतापाच्या भाषेतून त्यांनी नकार

दिला आहे. अशाप्रकारे त्यांची रचना समाजातील जळजळीत अनुभवाची, जाणिवांची, संवेदनशीलपणे विद्रोही अभिव्यक्तीने प्रगट झालेली दिसून येते.

दलितांच्या जीवनाची शतकानुशतके झालेली नाकेबंदी, मानव्याची कुचंबणा ज. वि. पवारांनी आपल्या 'नाकेबंदी' या ' कवितासंग्रहातून अभिव्यक्त केली आहे. "किती जेल्स किती बरैक्स याचा एकदा हिशेब करा. उधाणलेल्या समुद्राला बांधणार कसं याचं एकदा गणित मांडा समतेचे वारं प्यालेली पाखरं त्यांना असं डांबू नका तुरुंगासह ती उडून जाणार नाहीतच अशा भ्रमात राहू नका." ('नाकेबंदी' पृष्ठ ३२)

ज. वि. पवारांच्या कवितासंग्रहातून प्रस्थापितानी आजवर केलेली दलितांची नाकेबंदी आणि या जुलमी व्यवस्थेला कंटाळून आता दलितांनी केलेली शोषकांची 'नाकेबंदी' अत्यंत विद्रोही भाषेतून प्रगट झाली आहे. त्याबरोबरच त्यांना मार्क्सच्या रक्तरंजित क्रांतीपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला करुणमय बुद्ध जवळचा वाटतो. त्यामुळेच त्यांच्या भाषेने सामाजिक बांधिलकी जपून विधायक मागच्या परिवर्तनाची वाट धरलेली दिसून येते.

थोडक्यात, समाजव्यवस्थेने दलितांना कसल्याच प्रकारचे हक्क आणि अधिकार दिले नाहीत. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, विषमतेमुळे दलित समाज अन्यायग्रस्त बनला. दलितेत्तरांची टोकाची अस्पृश्यता आणि जातीय व्यवस्थेला कंटाळून दलित समाज समताधिष्ठित समाजव्यवस्थेची मागणी करू लागला. त्यामुळे दलित साहित्याची भाषा विद्रोहाची दिसून येते.

**संदर्भ :**

१) योगेंद्र मेश्राम - 'दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८

२) डॉ. शरणकुमार लिंबाळे, 'शतकातील दलित विचार', बौद्ध साहित्य संमेलन, महाड १९७१, अध्यक्षीय भाषण-बाबुराव बागुल, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे ३०, २००७.

३) शेषराव मोरे - 'डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास', राजहंस प्रकाशन, पुणे ३०, १९९८.

४) प्रभाकर मांडे, - दलित साहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद, १९७९.